Val II, Issue:VIII, Sept 2012

ISSN : 2230-7850

# Indian Streams Research Journal

Impact Factor 0.2105

## Monthly Multidisciplinary Research Journal



Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N. Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 8, Sept 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# “महात्मा फुलेंचे राजकीय विचारः एक चिकीत्सक अब्यास”

जाधव विशाल रामहरी

कला व वाणिज्य महाविद्यालय़ राहू . ता . दौड़ जि . पूणे .

## *प्रस्तावना :–*

सामाजिक क्रांतीचे अग्रदुत मानवी मुक्तीचे थोर प्रणेते़ कृषी क्रांतीचे जनक आणि मानवी स्वातंञ्य समतेचे महान पुरस्कर्ते म्हणून महात्मा जोतिबा फुले यांचे राजकीय विचार व सामाजिक विचार अतिशय महत्वपुर्ण मानले जातात . अव्वल इंग्रजी राजवटीपासून ते भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेचा काळ त्यांनी पाहिला त्यांचा जन्म **11** एप्रिल **1827** मध्ये झाला . त्यांच्या जन्मावेळी पेशवाईचा अस्त होऊन दहा वर्षे लोटली होती . आणि ब्रिटीश गव्हर्नर एल्फिन्टस्टन राज्याची घडी हळू हळू पण पक्क्या रितीने बसव्ऒत होते . त्या काळातील धार्मिक़ राजकीय़ सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीचा फार मोठा प्रभाव महात्मा फुलेंवर पडत गेला . व त्यातून त्यांची विचारसरणी व चळवळी उभ्या रहात गेल्या . त्यांनी शिवाजी महाराज यांच्या कार्याचा़ चरित्राचा अभ्यास तर केलाच पण त्याच बरोबर संत तुकाराम़ एकनाथ़ ज्ञानेश्वऱ रामदास प्रभुती संतांच्या साहित्याचाही अभ्यास केला . वेद़ उपनिषद व गीता यांचा अर्थही त्यांनी चिकित्सकपणे लक्षात घेतला . इंग्रजी साहित्याचा वाचनाने त्यांच्या विचारसरणीवर निश्‍चितपणे प्रभाव पडला . थॉमस पेनचा राईटस् ऑफ मेन हा ग्रंथ आणि वॉशिंग्टनचे चरित्र त्यांनी अभ्यासले . अमेरिकन स्वातंञ्य चळवळीपासून त्यांनी प्रेरणा घेतली . आपला गुलामगिरी हा ग्रंथ निग्नोच्या चळवळीला अर्पण केला . जे . एस . मिलच्या स्वातंञ्य विषयक मतांचे त्यांनी अध्ययन केले तसेच हर्बर्ट स्पेन्सरच्या वाड् . मयाचेही चिकित्सक वाचन केले .

महात्मा फुलेंनी आपल्या राजकीय विचारांमध्ये समता विषयक सार्वत्रिक लोकशिक्षण विषयक़ अस्पृश्यता विषयक शेतकरी विषयक तसेच स्त्री पुरूष हक्कांविषयीचे विचार प्रस्थापित केलेले आहेत . महात्मा फुलेंच्या राजकीय विचारांवर प्रामुख्याने पाश्चिमात्य तसेच भारतीय साहित्यांचाही प्रभाव आढळून येतो . महात्मा फुलेंच्या राजकीय विचारांमध्ये प्रामुख्याने शेतकरी विषयक व शिक्षणविषयक विचार आढळून येतात . महात्मा फुलेंनी शेतकरी विषयक विचारांमध्ये शेतर्कयांचे प्रश्ऩ शेतर्कयांची दारिद्रयाची कारणे व त्यावरील उपाय योजना या अतिशय स्पष्टपणे सांगितल्या आहेत .

महात्मा फुलेंच्या राजकीय विचारांमध्ये शेतर्कयांच्या प्रश्नांबरोबरच शिक्षण विषयक प्रश्ऩ समाजव्यवस्थेविषयक प्रश्ऩ अस्पृश्यते बाबतचे प्रश्ऩ स्त्री ́ पुरूष हक्कांबाबतचे प्रश्न इ . चा अभ्यासू दृष्टिकोन मांडला आहे . तत्कालिन परिस्थितीमध्ये शिक्षणाच्या या महामेरूला अनेक प्रकारच्या राजकीय़ सामाजिक व आर्थिक प्रश्नांना देखिल तोंड घ्यावे लागले . महात्मा फुलेंनी शैक्षणिक दृष्टिकोनातून तत्कालीन परिस्थितीचा विचार करून भविष्यकालीन शिक्षण व्यवस्थेची बीजे बोवली होती . त्याकाळामध्ये जर स्त्रीच्या शिक्षण व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले असते तर आधुनिक काळात देखिल किंवा सद्य परिस्थितीत स्त्रीची भूमिका ही चुल व मुल यापर्यंतच मर्यादित राहिली असती .

एकंदरीत चिकित्सक अभ्यास करता असे दिसून येते की महात्मा जोतिबा फुलेंच्या राजकीय विचारांमध्ये त्यांनी मांडलेले सामाजिक विचाऱ राजकीय विचाऱ सांस्कृतिक विचाऱ आर्थिक विचार हे आधुनिक काळातील पिढीला देखिल अत्यंत महत्वपूर्ण ठरतात .

महात्मा फुलेंनी आपल्या सामाजिक विचारांमध्ये स्त्री ́ पुरूष हक्क़ अस्पृश्यता विषयक विचाऱ जातीभेदाबाबतचे विचार मांडलेले आहेत . सांस्कृतिक विचारांमध्ये तत्कालिन ब्रिटीश राजकर्त्याकडून भारतीय समाजाचे झालेले शैक्षणिक शोषण़ शिक्षणाविषयीची संकुचित भावना़ समाजाला गुलाम बनविण्यासाठी भारतीय जनतेला नेहमीच ब्रिटीशांकडून शिक्षणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला गेला . त्याचबरोबर भारतामध्ये असर्णाया चाली रिती़ रूढी ́ परंपरा अंधश्रध्दा इ . मुळे ते यशस्विही झाले . महात्मा फुलेंच्या मते तत्कालिन परिस्थितीमध्ये अस्पृश्यता स्त्री ́ पुरूष असमानता शिक्षणापासून वंचित असणारा समाज़ अंधश्रध्दा इ . कारणे ही समाजव्यवस्थेला लागलेली किड आहे . महात्मा फुलेंचे राजकीय विचार एक चिकित्सक अभ्यास या लघूशोध प्रबंधातून समाजातील सदय परिस्थितीतील समस्या़ जातीभेदाचे प्रश्ऩ शेतर्कयांच्या आत्महत्या रोखण्यासाठी किंवा शेतर्कयांच्या दारिद्रयाची कारणे याबाबतच्या उपाययोजना सरकारने सकारात्मक दृष्टिकोनातून आमलात आणल्या तर हा लघुशोध प्रबंध आधुनिक काळातील राजकीय व सामाजिक व्यवस्थेला एक उत्कृष्ट मार्गदर्शन ठरेल .

महात्मा फुलेंचा वैचारिक पाया हा मुळतः समतेवर आधारलेला आहे . त्यांच्या मते सर्व माणसे ही ईश्वरी अपत्ये आहेत व त्यामुळे सर्वजण सारख्याच सन्मानास पात्र आहेत . समाजामध्ये कोणी उर्च्चनीच़ गरीर्बश्रीमंत़ असणार नाही . ईश्वराने जे अधिकार मानवास प्रदान केले आहेत . त्यांचा उपयोग सर्वाना समानरितीने घेता आले पाहिजे . अर्थात या समाजामध्ये सर्व व्यक्तींना सामाजिक व राजकीय स्वातंञ्य हे असायला हवे . महात्मा फुलेंनी समता हे मानवाचे मुलाभूत मूल्य म्हणून स्विकारले .

**Please cite this Article as :**जाधव विशाल रामहरी **,** “महात्मा फुलेंचे राजकीय विचारः एक चिकीत्सक अब्यास” **: Indian Streams Research Journal (Sept. ; 2012)**

समाजातील शेवटच्या व्यक्तीलाही सन्मानपूर्वक जगता यावे ही त्यांची समतेबद्दलची धारणा होती . सर्वांगीण विकासाची संधी सर्वांनाच मिळाली तर समता निर्माण होईल असे त्यांना वाटते . त्यासाठी महात्मा फुलेंनी संधीच्या समानतेचा आग्रह धरला . कोणताही नागरिक इतर नागरिकांना खरेदी करू शकेल इतका धनसंपन्न असू नये किंवा स्वतःला गहाण टाकणे भाग पडेल इतका तो दरिद्री असता कामा नये . इथपर्यंत स्पष्ट व वास्तवीक दृष्टिकोन महात्मा फुलेंच्या विचारांमध्ये आढळून येतो .

## संशोधनाची आवश्यकता :

महात्मा फुलेंचे राजकीय विचार हे आधुनिक राजकीय व्यवस्थेतील समस्यांची सोडवणूक यशस्विपणे करण्यासाठी महत्वपूर्ण ठरतात . म . फुलेंनी आपल्या राजकीय विचारांमध्ये तत्कालीन परिस्थितीमध्ये राजकीय समस्यांची वाचा कोडली आहे . आपल्या राजकीय विचारांमध्ये तत्कालीन परिस्थितीमध्ये राजकीय समस्यांची वाचा फोडली आहे . आपल्या राजकीय विचारांमधून त्यांनी ब्रिटीशांच्या अस्पृश्यांवरील व शेतर्कयांवरील अन्यायाला आपल्या ग्रंथातून व लेखनातून वाचा फोडली . आपल्या राजकीय विचारांमधून ब्राम्हणांनी व उच्चवर्गीयांनी केलेल्या अस्पृश्यांवरील अन्याय अत्याचारांना उत्तरे शोधण्याचा प्रयत्न हा केलेला आहे .

महात्मा फुलेंचे तत्कालिन राजकीय विचार हे आधुनिक काळातील पिढीशी देखिल तर्कसंगत ठरू शकतात . आधुनिक काळातील शेतर्कयांच्या व तत्कालिन शेतर्कयांच्या समस्यांमध्ये फारसा फरक नाही . तेच प्रश्न त्याच समस्या आजच्या शेतर्कयांना भेडसावतांना दिसतात . त्यामध्ये प्रामुख्याने शेतर्कयांच्या दारिद्रयाचा प्रश्न त्याचबरोबर कर्ज बाजारीचा प्रश्न उपाययोजना हया आजच्या सरकारने जर आमलात आणल्या तर शेतकरी हा नक्कीच दारिद्रयाच्या आणि कर्जाच्या जाळयातून बाहेर पडेल आणि काही अंशी तरी शेतर्कयांच्या आत्महत्या थांबतील अशी अपेक्षा करू . शेतर्कयांच्या समस्या सोडवितांना त्यांनी शिक्षण व्यवस्थेचेही महत्व पटवून घेणेही गरजेचे आहे . शेतर्कयांसाठी शेतीस पुरक असर्णाया शिक्षणाची व्यवस्था ही करून दिली पाहिजे . असे झाल्यास शेतर्कयांची शेतीबद्दलची उत्सुकता व आत्मियता वाढेल . असे उच्चकोटीचे विचार मांडर्णाया महात्मा फुलेंचे राजकीय विचार हे आजच्या शिक्षण व्यवस्थेतील आणि शेतीव्यवस्थेतील दुरावस्था दूर करण्यासाठी व त्याची कारणे शोधून त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी अतिशय मोलाचे मार्गदर्शक ठरणारे आहेत .

तत्कालीन समाजव्यवस्थेचा अभ्यास करून म . फुलेंनी समाजव्यवस्थेतील रूढी परंपरा जातीव्यस्था अंधश्रध्दा इ . चे उच्चाटण करण्यासाठी जे विचार मांडलेले आहेत ते अद्वितीय असून आधुनिक समाज व्यवस्थेला देखिल मार्गदर्शक ठरतात . म . फुलेनी आपल्या राजकीय विचारांमध्ये तत्कालीन व्यवस्थेतील वाईट चालिरितींचा रूढी परंपरेचा वास्तविक दृष्टीकोनातून अभ्यास करून जे अभुतपूर्व विचार मांडलेले आहेत ते विचार आधुनिक काळातील समाजव्यवस्थेला सुध्दा पुरक ठरतात . आधुनिक काळामध्ये देखिल समाजात जातीव्यवस्था चाली रिती रूढीपरंपरा धर्मवाद वंशपाद उच्च निचता ही टिकून आहे . हे भेदभाव नष्ट करण्यासाठी महात्मा फुलेंचे राजकीय विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविणे अतिशय महत्वाचे ठरते . सरकारने यामध्ये आपली अग्रगण्य भूमिका बजवावी लागेल . असे झाल्यास महात्मा फुलेंच्या राजकीय विचारांच्या मदतीने सदय परिस्थितीतील भारत देशास र्खया अर्थाने वास्तविक दृष्टीकोनातून एक आधुनिक बलशाली व अबुतपुर्व भारत बनण्यास काही वेळ लागणार नाही . आणि याच कारणाने म . फुलेंचे राजकीय विचार हे अतिशय परिवर्तनमात्मक व महत्वपुर्व ठरतात .

## आधुनिक संशोधनाचा व साहित्याचा आढावा :-

संबंधीत संशोधनामध्ये आधुनिक विचारवंतांनी महात्मा फुलेंवर केलेले संशौधन तसेच साहित्य इ . चा आढावा घेण्यात येईल .

## अभ्यासाचे महत्व :-

विसाव्या शतकाच्या मध्यकालात निर्माण झालेल्या भारतीय प्रजासत्ताक राज्याचे अधिष्ठान म्हणून अवश्यक असलेल्या आणि मूलभूत मानवी हक्काच्या आधारावर निर्माण झालेल्या भारतीय समाजरचनेच्या स्थापनेस अवश्यक असलेली मानवी समानतेचा पुरस्कार करणारी आणि जाती भेद व धर्मभेद यांना धिक्कारणारी विचारसरणी जोतीरावांनी आपल्या राजकीय विचारांमध्ये आवेषाने सांगितली . आणि या कारणाने या शोधनिबंधाला आज देखिल महत्व आहे .

जोतिराव फुले यांचे इंग्रजी शिक्षण शालांत परीक्षेकडे गेले नव्हते . इंग्रजी विचाररूपी वाधीणीचे दूध जन्मतः जे वाघ नाहीत त्यांना कितीही मिळाले तरी त्यांचे नरव्याघ्र बनु शकत नाहीत . इंग्रजी विद्येमध्ये पारंगत झालेले व विद्यापीठामध्ये उच्चपदव्या संपादन केलेले शेकडो सुशिक्षित भारतात झाले . परंतु युगाला आव्हान देणारे आणि परंपरागत मध्ययुगीन समाज रचनेला उखडून टाकणारे समाजक्रांतीचे विचार एकाकी राहण्याची पर्वा न करता घोषित केले . या नरव्याघ्रांच्या घोषणांनी एकोणिसावे शतक हादरत होते . विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय स्वातंज्याच्या स्थापनेनंतर ती जूनी समाजरचना आता त्याच विचारांच्या शक्तीमुळे खिळखीळी होऊन कोलमडू पाहात आहे . या पहिल्या नरव्याघ्रांना जोतीराव फुले हे अग्रणी म्हणून ओळखतात .

जोतीरावांचा विचार हा मानवी स्वातंज्याकडे व समतेकडे नेणारा विचार होता . ऊे रहस्य त्यांनी निर्माण केलेल्या सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळीतील नेत्यांना फारच उशीरा उमगले . गुलामगिरी या त्यांच्या पुस्तकाची अर्पण पत्रिका त्यांचा उद्देश सुचित करते . गुलामगिरी हे पुस्तक त्यांनी निग्रो गुलामांना मुक्त करण्यासाठी आंदोलन चालविर्णाया लोकांना अर्पण केलेले आहे . यावरूनच त्यांची समानते बाबतची महान विचारसरणी प्रकर्षाने जाणवते .

भारतातील परंपरागत समाजसंस्थांच्या विरूध्द बंड करणारे पहिले पुरूष म्हणजे जोतीबा फुले होते . भारतातील परंपरावादी समाजसंस्थांची व या समाजसंस्थांच्या नियम धर्माची पकड इथल्या जनमानसात पक्की बसलेली असताना महात्मा फुलेंना अशा प्रवाहाच्या विरोधी असर्णाया विचारसरणीची प्रेरणा कोठून मिळाली ऋ असा मोठा प्रश्न पडतो . आणि या प्रश्नाचे उत्तर शोधतानाच आधुनिक युगातील तरूणांना या योगी पुरूषंच्या कार्याबद्दल जाणीव निर्माण करून देता येते . त्याचबरोबर तत्कालीन परिस्थिती व सद्य परिस्थितीमध्ये असणारा फरक व असणारे साम्य व यांचा योग्य मेळ घालून मांडलेले विज्ञानात्मक दृष्टीकोनातील राजकीय विचार हे आज ही समाजव्यवस्थेला कसे तर्कसंग ठरू शकतात हे ठामपणे सांगता येते . स्वातंज्यपुर्वकालीन परिस्थितीमध्ये इथे सामाजिक जन्मसिध्द उच्च निच भाव हे ईश्वरी संकेताने व माणसाच्या पुर्व र्क्माने निर्माण झाले आहेत . म्हणून त्यांच्या विरूध्द विचार मांडून समाजाला बदलून टाकण्याचे प्रयत्न करणे म्हणजे महापाप आहे . असे विचार रूजविण्यात आले होते . जनमानसामध्ये रूजलेली खोलवरची भिती घालवणारी एक अनोखी प्रेरणा या व्यक्तीमत्वाला कोठून मिळाली ऋ महात्मा फुलेंना सामाजिक बंधनाचे जे चक्रव्युह दिसले आणि त्याला तोडण्याचे शिक्षण आणि प्रेरणा कोठून मिळाली ऋ या आणि अशा असंख्य प्रश्नांचा डोंगरच समोर उभा राहतो . अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी व महात्मा फुलेंचे महात्म्य जाणून घेण्यासाठी संबंधीत शोध निबंधामध्ये महात्मा फुलेंचे राजकीय विचार अभ्यासणे महत्वाचे ठरते .

## गृहितके ः

**1** . महात्मा फुलेंचे समाज विषयक व शिक्षण विषयक विचार त्यांच्या नंतरच्या पिढीलाही उपयुक्त ठरले ँ

महात्मा फुलेंच्या राजकीय विचारामध्ये त्यांने सांगितलेले समाजविषयक व शिक्षणविषयक विचार हे अतिशय महत्वपुर्ण मानले जातात . एवढेच नव्हेतर महात्मा फुलेंचे समाजविषयक व शिक्षणविषयक विचार हे त्यांच्या नंतरच्या पिढयांसाठी सुध्दा कसे उपयुक्त ठरले हे या शोध निबंधाच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला

जाणार आहे . महात्मा फुलेंनी स्वातंत्र्य पुर्वकालीन परिस्थितीमध्ये भविष्यकाळाचा वेध घेत शैक्षणिक कार्य केले होते असे म्हटले तरी ठरणार नाही . आज पासून शैक्षणिक कार्य केले तर लोकांना शिक्षणाचे महत्व हळू हळू कळू लागेल व समाजातील प्रत्येक घटकाला शैक्षणिक व सामाजिक शोषणापासून मुक्ती मिळेल . अशीच त्यांची भुमिका होती . महात्मा फुलेंचे शैक्षणिक विचार जर त्यावेळी समाजामध्ये रूजले नसते . तर आजच्या या आधुनिक भारताचे चित्र हे एवढे सजले नसते . महात्मा फुलेंच्या शैक्षणिक विचारांमध्ये प्रामुख्याने अस्पृश्यांचे शिक्षण आणि स्त्री शिक्षण हे अभुतपुर्व पैलू मानले जातात .

**2** . महात्मा फुलेंनी केलेले शेतर्कयांच्या स्थितीचे विश्लेषण व त्यावरील उपाय तर्कसंगत आणि विज्ञाननिष्ठ आहेत .:

महात्मा फुलेंनी केलेले शेतर्कयांच्या स्थितीचे विश्लेषण व त्यावरील उपाय तर्कसंगत आणि विज्ञाननिष्ठ आहेत हे या शोध निबंधाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे . महात्मा फुलेंचे शेतर्कयांच्या समस्येवरील विचार आजही लागू पडतात आणि मार्गदर्शक ठरतात . तत्कालीन शेतर्कयांच्या आणि सद्य शेतर्कयांच्या परिस्थितीमध्ये विशेष असा फरक जाणवत नाही .

**3** . महात्मा फुलेंचे शेतर्कयांच्या समस्येवरील विचार आजही लागू पडतात व मार्गदर्शक ठरतात :

शेतर्कयांच्या विध्वंसाला शेतर्कयांची शैक्षणिक परिस्थितीही मोठया प्रमाणात कारणीभूत ठरते . शेतर्कयामध्ये शैक्षणिक जागृती निर्माण करून शेतर्कयांना शेती व्यवसायाला पुरक असे शिक्षण दिले गेले पाहिजे . आज ही अशा शिक्षणाची आजच्या शेतर्कयांना आवश्यकता आहे . आजचा शेतकरी देखील शेती व्यवसायापासून दूर जात आहे . त्याला निसर्गाबरोबर शासकीय ध्येय धोरणेही तेवढेच जबाबदार आहेत . महात्मा फुलेंच्या राजकीय विचारामध्ये महात्मा फुलेंनी शेतकरी विषयक विचारांना सर्व प्रथम स्थान दिल्याचे दिसून येते .

**संशोधन पध्दती :**

महात्मा फुले यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करण्यासाठी मुख्यतः ग्रंथालय पध्दतीचा अवलंब करण्यात येईल . त्यामध्ये खालील प्रमाणे तथ्य संकलन केले जाईल .

**A) प्रथम स्त्रोत :**

महात्मा फुलेंनी स्वतः लिहलेले ग्रंथ लेख अग्रलेख यामधून महात्मा फुलेंचे विचार संकलीत करण्यात येतील .

**ब) द्वितीय स्त्रोत :**

आधुनिक काळात संशोधकांनी महात्मा फुलेवर लिहलेली ग्रंथ लेख अग्रलेख त्याच बरोबर साप्ताहिके मासिके त्रैमासिके वर्तमानपत्रे इत्यादीद्वारे महात्मा फुलेंच्या विचाराचे आधुनिक संदर्भ संकलीत करण्यात येतील .

**समारोप :**

महात्मा फुलेंच्या राजकीय विचारांचे आधुनिक संशोधकांनी व विचारवंतांनी केलेले मुल्यमापन अभ्यासण्याचा प्रयत्न केला जाईल . फुल्यांना जाऊन आज 111 वर्षे झालीत . फुल्यांच्या हयातील आणि नंतरही तोंडी लेखी आक्षेप त्यांच्यावर व त्यांच्या साहित्यावर घेतले गेले . त्याचा उहपोह आणि त्यावरील तर्क संगत मुल्यमापन करण्यात येईल .

पुर्वकाळापासूनच योगिपुरूषांवर व महापुरूषांवर टिका व टिप्पणी ही होत आली . तत्कालीन समाज कंटकांनी तसेच आधुनिक काळातील टिकाकारांनी आपल्या समीक्षणातून वृत्तपत्राद्वारे साप्ताहिकाद्वारे आणि मासिकाद्वारे टिका केलेली आहे . याला महात्मा फुले हे देखिल अपवाद ठरू शकले नाहीत .

असे असले तरी जोतीरावांच्या चरित्राची अनेक पुस्तके अनेकांनी लिहिली आहेत . त्यातील श्री धनंजयकीर यांच्या फुले चरित्रा शिवाय इतर पुस्तके चरित्राबरोबरच प्रचाराच्या उद्देशाने लिहिली गेली आहेत . काही चरित्रकारांनी ब्राम्हणोत्तरवादाच्या मुळाशी असलेला अंतिम ध्येयवाद बराचसा डोळयाआड केल्यामुळे त्या चळवळीला 1919 च्या सुमारास स्वराज्य चळवळीच्या विरोधातही वळण लागले होते . महात्मा फुलेंच्या विचारानंतर अनेक आधुनिक विचारवंतांनी टिका केलेली आहे . त्यामध्ये प्रामुख्याने विष्णूशास्त्री चिपळूणकर चिंतामण ओक प्रा . न . र . फाटक लक्ष्मण शास्री जोशी डॉ . बाळ गांगल इत्यादी विचारवंताचा समावेश होतो . या आधुनिक विचारवंतांच्या विचारांचा अभ्यास त्यांनी लिहलेल्या पुस्तकाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे . महात्मा फुलेंच्या कवितावर ही आधुनिक विचारवंतांनी टिका टिप्पणी केली असल्याचे आढळून येते .

**संदर्भ ग्रंथसूची :**


1 शेतर्कयांचा आसूड' जोतिबा गोविंदराव फुले

2 गुलामगिरी महात्मा फुले समग्र वाडःमय ह्यसंपा फडके य . दि . ह्र महाराष्ट्र राज्य साहित्यासंस्कृती मंडळ मुंबई पा . आ . नोव्हेंबर 1991 .

3 इशारा जोतिबा गोविंदराव फुले

4 भारतीय राजकीय विचारवंत कृ . दि . बोराळकर तिसरी आवृत्ती जून 1995 . विद्याबुक पब्लीशेर औरंगपुरा औरंगाबाद .

5 डॉ . भा . ल . भोळे आधुनिक भारतीय विचारवंत पिंपळापुरे अँड कं . पब्लिशर्स नागपूर पहिली आवृत्ती . जून 1995 .

6बी . बी . मिश्रा : दि . इंडियन मिडल क्लासेस ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस बॉम्बे 1961 .

7जी . एस . घूर्ये कास्ट अॅन्ड रेस इंन इंडिया पॉप्युलर प्रकाशन बॉम्बे 1969 .

8बा . ग . पवार (संपा) युगपुरूष “महात्मा ज्योतीराव फुले” (चरित्र ग्रंथ) मातृभूमी प्रकाशन 'वंदे मातरम्' भारती नगर पौड मार्ग पुणे 28 नोव्हेंबर 1991 .

9धनंजय कीर ह्यसंपाह्र महात्मा ज्योतीराव फुले आमच्या सामाजिक क्रांतीचे जनक पॉप्युलर प्रकाशन मुंबई 1968 .

10डॉ . ज . रा . शिंदे भारतीय राजकीय विचारवंत कैलास पब्लिकेशन औरंगपुरा औरंगाबाद द्वितीय आवृत्ती 1999 .

11डॉ . दा . धो . काचोळे भारतीय सामाजिक विचारवंत कैलास पब्लिकेशन गोकुळवाडी औरंगपुरा औरंगाबाद प्रथमावृत्ती 25 जुलै 1999 .

12 हरि नरके य . दि . फडके (संपा) महात्मा फुले गौरव ग्रंथ खंड पहिला सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ नवीन प्रशासन भवन मुंबई 32 सुधारीत द्वितीयवृत्ती 28 नोव्हेंबर 1991 .
13 महात्मा फुले गौरव ग्रंथ (संपा . साळुंके पी . बी) महात्मा फुले शैक्षणिक तत्वज्ञान व कार्ये महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई जुलै 1982 .
14 प्राचार्य आणासाहेब गरूड, प्राचार्य बी . बी . सावंत महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास कैलास पब्लिशन्स औरंगपुरा औरंगाबाद प्रकाशन 1995 .
15 खैरमोडे चा . भ . डॉ . भिमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड सुगावा प्रकाशन पुणे 1992 .
16 महात्मा फुले टिका आणि टिकाकार निळकंट बोराडे सुगावा प्रकाशन 56 सदाशिव पेठ पुणे 30 प्रथम आवृत्ती 15 ऑगस्ट 2002 .
17 डॉ . भास्कर भोळे भारतीय राजकीय विचारवंत पिंपळापुरे अँड कं . पब्लिशर्स नागपूर पहिली आवृत्ती जून 1995 .
18 दिलीप रा . मढीकर महात्मा फुले जीवन आणि कार्य .
19 डॉ . सरोज आगलावे जोतीराव फुले सामाजिक तत्वज्ञान .
20 प्रा . श्री . नेरूरकर फुले आंबेडकर दलित साहित्य .
21 निळकंठ बोराडे महात्मा फुले टिका आणि टिकाकार सुगावा प्रकाशन 562 . सदाशिव पेठ पुणे .

२२ नियतकालिके ः

1 लोकराज्य योजना
2 दै . सकाळ दै . लोकमत दै . लोकसत्ता दै . लोकाशा .

# Publish Research Article

**International Level Multidisciplinary Research Journal**

## For All Subjects

*Dear Sir/Madam,*

*We invite original unpublished research paper. Summary of Research Projetc, Theses, Books and Books Review of publication, You will be pleased to know that our journals are..*

### Associated and Indexed, India

- *OPEN J-GATE*
- *International Scientific Journal Consortium Scientific*

### Associated and Indexed, USA

- Google Scholar
- DOAJ
- EBSCO
- Index Copernicus
- Academic Journal Database
- Publication Index
- Scientific Resources Database
- Recent Science Index
- Scholar Journals Index
- Directory of Academic Resources
- Elite Scientific Journal Archive
- Current Index to Scholarly Journals
- Digital Journals Database
- Academic Paper Database
- Contemporary Research Index



**Indian Streams Research Journal**
**258/34, Raviwar Peth Solapur-413005, Maharashtra**
**Contact:- 9595359435**
**E-Mail- ayisrj@yahoo.in / ayisrj2011@gmail.com**
**Website:- www.isrj.net**